# लोकप्रशासनातर्फे कार्यशाळेचे आयोजन

देगलूर, ता.२१ : स्वारातीम विद्यापीठ नांदेड व आडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए. तृतीय वर्ष लोकप्रशासन विषयाच्या नवीन अभ्यासक्रमावर ऑनलाइन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. (ता.२५) जून २०२१ रोजी होणाऱ्या या कार्यशाळेत बी.ए. तृतीय वर्षाच्या नवीन अभ्यासक्रमावर लोकप्रशासन अभ्यास मंडळ व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापक यांच्यामध्ये विचारमंथन केले जाणार आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बेम्बरेकर राहणार असून कार्यशाळेचे कुलगुरू डॉ.उद्धव भोसले यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.